# प्रेस नोट

दिनांक १४/११/२०२४ रोजी काळाचौकी पोलीस ठाणे हददीत रात्रपाळी कर्तव्य करीत असताना ठीक ०१:५० वाजता चे दरम्यान बेल्जियम या देशाचे नागरिक नामे विल्यम जुमेट हे मुंबई एअरपोर्ट वरून ते सद्या राहत असलेल्या हॉटेल कडे येत असताना त्यांच्याजवळील ब्लॅक कलरचा कोट, त्यात त्यांचे पासपोर्ट, ओप्पो कंपनीचा १,२०,०००/- किमतीचा मोबाईल फोन, तसेच त्यांच्याकडे त्यांच्या देशाचे व भारतीय चलनाची अंदाजे ५०,०००/- रुपये ब्लॅक कोटमधे ते कुठेतरी विसरल्यामुळे त्यांना मिळुन येत नसल्याने पोलीस ठाणेस तक्रार देणे कामी आले.

काळाचौकी पोलिस स्टेशन येथे रात्रपाळी ठाणे अंमलदार कर्तव्यावर असलेले म.पो.उप. नि. संजीवनी इंगळे यांनी बेल्जियम या देशाचे नागरिक नामे विल्यम जुमेट यांचे तक्रारीची तात्काळ दखल घेतली व विल्यम जुमेट यांच्या हरवलेल्या वस्तु व रक्कम चा शोध घेण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख स.पो.नि. मुलाणी व पथकाच्या मदतीने क्षणाचाही विलंब न करता विल्यम जूमेट यांच्या हरवलेल्या वस्तुंचा शोध सुरू केला. त्यांनी केलेल्या प्रवासाची सविस्तर माहिती घेऊन विल्यम जुमेट यांनी प्रवासाकरीता वापरलेल्या टॅक्सी चा एअर पोर्ट परीसरात तसेच त्यांच्या प्रवासाचा मार्गावर शोध घेतला. व टॅक्सी क्रमांक प्राप्त करून टॅक्सी चालकाचा मोबाईल क्रमांक मिळवुन अतिशय कमी कालावधीत तक्रारदार यांचे प्रवासात हरवलेले वरील वर्णन केलेले सर्व वस्तु व रक्कम मपोउपनि. इंगळे, सपोनि मुलानी व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी उत्कष्टपणे तपास करून तक्रारदार यांना तात्काळ मिळवून दिले.

त्याबाबत बेल्जियम देशाचे नागरिक विल्यम ज्युमेट यांनी ड्यूटी ऑफिसर म.पो.उप.नि. संजीवनी इंगळे, रात्रपाळी पर्यवेक्षक तानाजी कुंभार तसेच त्यांना सदर तपासाकरिता मदत करणारे अंमलदार व संपूर्ण मुंबई पोलिस दलाचे आभार मानले.

विल्यम ज्युमेट यांनी आभार प्रकट केलेले पत्र सोबत जोडत आहे.

आदरपूर्वक सविनय सादर

(जगदीश शेलकर)
प्रभारी व पो. निरीक्षक
काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई